


सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड ची भव्य इमारत

बुक – पोस्ट

242

प्रति, ..............................................................

..............................................................

..............................................................

प्रेषक : डॉ. शिवकुमार सोनाळकर
संपादक तथा अध्यक्ष
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ
द्वारा, अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी अ,
सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६०१२

# शिविम संशोधन पत्रिका

## ...ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)
ता. कराड जि. सातारा
राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा)

* ... नाथ २७०
... ारुडातील परमार्थ २७२
* संत एकनाथांच्या भारूडांचे स्वरूप
  प्रा. लक्ष्मी पवार २७५
* संत एकनाथांच्या भारुडातील सामाजिक दर्शन
  प्रा. विलास सुर्वे २७८
* संत वाङ्मयातील एक अविष्कार : 'भारुड'
  नेहा भारत ढेकळे २८२
* वारकारी संप्रदायातील तुकाराम
  प्रा.संजय चव्हाण २८५
* वारकरी संप्रदाय आणि संत तुकारामांची शिकवण
  डॉ. मनमोहन राजे २८९
* संत तुकाराम – संत बहिणाबाई भावबंध
  डॉ. रमेश पोळ २९४
* संत तुकारामांचे सांस्कृतिक योगदान
  प्रा. विजयकुमार रेंदाळकर २९८
* तुकाराम मीमांसा : एक आकलन
  मच्छगंधाली तारळेकर ३०१
* संत तुकाराम यांच्या काव्यातील समाजदर्शन
  डॉ. कृष्णा भवारी ३०५
* संत तुकारामांच्या अभंगातील लोककथा
  डॉ. यशवंत चव्हाण ३०९
* संत तुकारामांच्या साहित्यातील समकालिन जीवनमूल्ये
  श्री.रघुनाथ गवळी ३१३
* संत तुकारामांची कविता
  डॉ. चंद्रकांत पोतदार ३१६
* निर्भिड टीकाकार संत तुकाराम
  डॉ. विश्वनाथ पवार ३१९
* बौद्ध तत्त्वज्ञान आणि संत तुकाराम
  प्रा. प्रज्ञा कांबळे–शिरगांवकर ३२२
* तुकाराम शोधाची नवी दृष्टी
  प्रा. राजेश पाटील ३२६
* संत तुकारामांच्या प्रभावातील कवी
  डॉ. सविता बेंजळे ३२९
* तुकारामशिष्या बहिणाबाई – एक अनुबंध
  डॉ. सौ. विजया पवार ३३३



* मध्ययुगीन संत कवयित्री
  डॉ. बाळासाहेब सुतार ३३६
* वारकरी सांप्रदायामधील स्त्री संतांची साहित्यिक कामगिरी
  डॉ.बाबासाहेब नाईक ३४०
* मराठीतील उपेक्षित संत एक दृष्टिक्षेप
  डॉ. उज्वला पाटील ३४४
* 'वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या उपेक्षा आणि अपेक्षा'
  प्रा. संगिता सूर्यवंशी ३४८
* स्त्री संतांच्या रचनेतील स्त्रीजाणिवा व आत्मभान
  डॉ. गोपाळ गावडे ३५३
* मध्ययुगीन कालखंड दत्त संप्रदायाचे स्थान
  प्रा. तानाजी काळुंगे, ३५७
* दत्त संप्रदाय
  संगिता साळुंखे ३६०
* दत्त संप्रदाय
  संगिता मोहिते ३६४
* भिन्न धर्म-संस्कृतिचा दृष्टा समन्वयक: दत्त संप्रदाय
  डॉ. दिनकर कुटे ३६८
* सूफी वारकरी संप्रदाय आणि समतेचे तत्त्वज्ञान
  प्रा.डॉ. विठ्ठल रोटे ३७१
* सूफी सम्प्रदाय में प्रेम की प्रधानता
  डॉ. दिलीपकुमार कसबे ३७४
* "सूफी साधना सम्प्रदाय और उनकी देन"
  डॉ. महिपती शिवदास ३७७
* जैन संप्रदाय
  डॉ. चंदना लोखंडे ३८१
* जैन संप्रदायाचे उपेक्षित मराठी साहित्य
  डॉ. अशोक तवर ३८३
* मध्ययुगीन रामायणे, आचार्य गुणकीर्ति आणि गुणकीर्तिरचित मराठी जैन रामायण
  डॉ. गोमटेश्वर पाटील, ३८७
* वीरशैव धर्मसंप्रदाय
  श्री. सिध्दमल्लय्या हिरेमठ ३९१
* वीरशैव धर्मातील प्रमुख धार्मिक संकल्पना
  डॉ. विजय रेवजे ३९६
* महात्मा बसवेश्वर आणि वीरशैव संप्रदाय
  प्रा. सुंदर कांबळे ३९८
* महात्मा बसवण्णा आणि वचन साहित्य
  डॉ शशिकला रणदिवे ४०२



Scanned with CamScanner

भावविवशता- युक्तीवाद, निस्पृहता-फटकळपणा या द्वंद्वाचा समुच्चय होय. अशाप्रकारे दि.पु.चित्रे यांनी तुकारामांची मीमांसा केलेली आहे.


संदर्भ

१. नसिराबादकर ल. रा. - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोलहपूर.

२. चित्रे दि. पु. - पुन्हा तुकाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३. हातकणंगलेकर म. द. - उगवाई, अंक चौथा, मार्च १९९०.


* * * * * *



# संत तुकाराम यांच्या काव्यातील समाजदर्शन


प्रा. डॉ. कृष्णा भवारी

मा. ब. श्री. कदम कन्या महाविद्यालय कडेगाव, जि.सांगली.


संत तुकारामांचे समाज वास्तवाचे निरीक्षण अत्यंत संवेदशील होते. त्याचे चित्रण त्यांनी अनेक अंगांनी आपल्या काव्यातून केले आहे. माणसाने संसार यशस्वी कसा करावा यासंबंधी संत तुकाराम यांनी व्यावहारिक आणि सैद्‌धांतिक स्वरूपाचे खालील अभंगातून वर्णन केले आहे.

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।<br>
उत्तम चि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।

सामान्य माणसाला संत तुकाराम महाराज व्यावहारिक सल्ला देतात की चांगला व्यवहार करुन धन प्राप्त करावे. कुणाला फसवून, कुणाला लुबाडून किंवा दुसऱ्याच्या कष्टाचे फळ आपण ओरबडून घेऊ नये असे ते सांगतात.

माणसाला जीवनात सुखी व्हायचे असेल तर सर्वात प्रथम दोन गोष्टींचा त्याग केला पाहिजे त्या म्हणंजे दुसऱ्याचे द्रव्य आणि दुसऱ्याची स्त्री, परस्त्री ही आई समान असते असे ते उपदेश करतात. तुकारामांना स्त्रीसंग विषासमान आहे असे वाटते. म्हणून या गोष्टींपासून माणसाने जाणीवपूर्वक दोन हात दूर राहिले पाहिजे असे ते म्हणतात.

स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाझा मृत्तिकेच्या ।।

तुकारामांनी स्त्रियांच्या विविध वृत्ती प्रवृत्तींवर प्रकाश टाकत असताना एका बाजुला अविचारी स्त्रीबद्दल संताप व्यक्त केला आहे तर दुसऱ्या बाजुला स्त्री ही संसाराचा एक आधारभूत घटक मानला आहे. स्त्रीला आपल्या आयुष्यात अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. मुलगी, पत्नी, आई अशा विविध भूमिका जबाबदारीने पार पाडाव्या लागतात. त्यासाठी स्त्रियांनी नेहमी सत्शील असले पाहिजे असे ते म्हणतात.

भारतीय संस्कृतीने पतिव्रता नारीचा मोठा गौरव केला आहे. पतिव्रता स्त्री ची सत्ता जगावरच नव्हे तर देवावर देखील चालते असे संत तुकाराम महाराज म्हणतात.

तुका म्हणे पतिव्रता । तिची देवावरी सत्ता ।।

म्हणून तुकाराम महाराज पुढे म्हणतात, पतिव्रता तिला म्हणावे, की जिच्या जीवनात पती शिवाय काहीच प्रमाण नाही.

संत तुकारामांनी स्त्री विषयी नेहमीच आदराची भावना व्यक्त केली आहे. त्यांच्यामते स्त्री ही सृजनाचा स्त्रोत आहे म्हणून ती पूजनीय आहे. परमार्थात देखील तिला मोठा अधिकार दिला आहे. त्यांच्या मते एक पुरुष संत झाला तर १४ पिढ्यांचा उद्धार करतो व एक स्त्री संत झाली तर बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करते.

जळतो दोषत्तचे डोंगर, शुद्ध होती नारी नर ।

वरील पद्य पंक्तीत संत तुकारामांनी जाणीवपूर्वक प्रथम नारी आणि नंतर नर असा उल्लेख

केलेला आहे. त्याचे कारण संत तुकाराम नेहमीच स्त्रियांना प्रधान स्थान देतात.

**दांभिकतेविषयी दृष्टिकोन**

संत तुकारामांनी आपल्या अभंगातून जसे कळकळीने लोकोपदेश केला आहे तसे काही अभंगातून रोखठोक भाषेत भोंदूगिरी, दांभिक आणि पाखंडी लोकांचे ढोंगसोंग आपल्या भक्तांच्या निर्दशनास आणून दिले आहे. नाही नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ।। या उक्तीप्रमाणे तुकारामांनी टिळे, माळमुद्रा आणि भगवी वस्त्रे इत्यादी बाह्य पोषाखाला विरोध करुन त्यांच्या आंतरिक पावित्र्यावर भर दिला आहे. नामस्मरणाचे महत्त्व न जाणता फक्त उच्च स्वरात शंखनाद करणाऱ्या व्यक्तीला ते खडसावून विचारतात की, इतक्या जोराने शंख वाजवण्याचा काय फायदा आहे? कपाळावर चंदनाचे गंध, गळ्यात फुलांच्या माळा, हातात फुलांची परडी घेऊन भगवंताच्या पूजेसाठी हे ढोंग कशासाठी ? दगडाच्या देवाची पूजा करून तो आपल्या साधुत्त्वाचे प्रदर्शन का करतो? असा खडा सवाल ते करतात. वाहनांनी बरबटलेल्या व्यक्तीच्या शरीरावरील हे भस्माचे पट्टे म्हणजे केवळ ढोंग आहे. अनुभव नसताना भगवे कपडे घालून जर मोक्ष मिळत असते तर भगव्या रंगाची सगळीच कुत्री मोक्षाला गेली असती असे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून म्हणतात. भगवे तरी श्वान सहज वेश त्याचा । तेथे अनुभवाचा काय पंथ?

अशा या ढोंगी साधू पासून माणसाने दूर राहिले पाहिजे. परंतु हे ढोंगी साधू एखाद्या चौकात उभे राहून बायकामुलांना एकत्र करतात. नाना तऱ्हेचे अंगविक्षेप करुन त्यांच्या जवळ पैसे मागतात. त्यांनी पैसे दिले नाही तर त्यांना शिव्या शाप देतात. अशा प्रकाच्या दांभिकते विरुद्ध तुकाराम नेहमीच आक्रमक झालेले दिसतात.

देव भक्तीचा बाजार मांडून असे भोंदू साधू समाजाची दिशाभूल करीत असल्यामुळे अशा साधुंचा संत तुकारामांनी आपल्या काव्यातून खरपूस समाचार घेतला आहे.

टिळा टोपी घालुनी माळा । म्हणती आम्ही साधू ।
दया धर्म चित्ती नाही। ते जाणावे भोंदू ।।

अशा भोंदू लोकांना जशास तसे उत्तर दिले पाहिजे म्हणून तुकारामांची वाणी कधी मेणाहून मऊ होते तर कधी वज्राहून कठोर बनते.

देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तिथे पैजाराचे काम । अधमासि तो अधम ।।

अशा प्रकारे संत तुकारामांनी अत्यंत परखडपणे आणि रोख ठोक पद्धतीने समाजातील ढोंगावर व दांभिकपणावर परखड शब्दांत हल्ला चढविल्यामुळे काही लोक दुखावले. या लोकांनी विविध प्रकारे तुकारामांचा छळ केला पण तुकारामांनी शेवटपर्यंत दुष्ट प्रवृत्तींशी झुंज दिली कारण –

अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी । आवरिता परी आवरेना ।।

या स्वभाव गुणधर्मामुळे आपण समाजाचा एक घटक आहोत आणि या समाजाविषयी आपली काही कर्तव्य आहेत ती पार पाडली पाहिजे हा दृष्टीकोन डोळ्यापुढे ठेवून तुकारामांनी अभंग रचना केलेली आहे.



**अंधश्रद्धा आणि क्षुद्र दैवते यांचा समाचार**

सतराव्या शतकाम धर्म, जातिभेद, देवभोळेपणा यांमध्ये समाज गुरफटून गेला होता. त्यामुळे अंधश्रद्धेचे प्राबल्य खूप वाढले होते. तुकारामांनी या समाजासाठी आपल्या अभंगाच्या माध्यमातून डोळस वृत्ती दाखवून कर्मकांडांवर प्रहार केला आहे. देव हा माणसात आहे हे त्यांनी वेळोवेळी सांगितले आहे. त्यासाठी तीर्थस्थानाच्या ठिकाणी जाण्याची गरज नाही असे त्यांनी सांगितले म्हणून ते म्हणतात.

तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।

संत तुकाराम महाराज नवस–सायास करणे, अंगात वारे येणे, अंगारा धुपारा देणे या गोष्टींचा धिक्कार करतात. ते म्हणतात नवस–सायास करून जर मुलं होत असतील तर पतीची गरजच काय? म्हणून तुम्हाला जर देवाची पूजा करायची नसेल तर भक्तिमार्गाने पंढरीच्या पांडुरंगाची पूजा करा. दगड धोंडे यांचे देव किंवा कैंद्राचे देव तुमचा उद्धार करणार नाही. ज्या देव–देवतांना लोक बकरा, कोंबडा कापतात अशा देवांचा तुकारामांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. ते म्हणतात–

शेंदरी हेंदरी हे देवी दैवते । कोण ती पुजे भुते केले ।

याचा अर्थ या शेंदराच्या देवांना तुकारामांनी भुते म्हणून हिणवले आहे. अशा प्रकारच्या क्षुद्र देवतांच्या मुळे समाज प्रगतिपथावर जाण्याऐवजी त्याची अधोगती होते, असे तुकारामांना वाटते.

ज्या दैवतांना सामान्य माणूस आपले कुलदैवत म्हणून ओळखत होता त्या जाखाई, जोखाई, मेसाई, भैरोबा, खंडोबा, मुंजा, म्हसोबा, वेताळ अशा अनेक दैवतांना की ज्यांना भक्त मद्य, मांसाचा नैवद्य देऊन नवस–सायास केले जायचे अशा भक्तांना तुकारामांनी खरी भक्ती कशात आहे याचे मर्म खालील अभंगातून सांगितले आहे.

नव्हे जाखाई जोखाई। मायराणी मेसाई । बळिया माझ्या पंढरीराव । जोया देवांचा ही देव ।।

थोडक्यात संत तुकारामांना पांडुरंगा शिवाय कोणतेच दैवत मान्य नाही असे दिसते. परंतु त्यांच्या पुढील अभंगात त्यांनी असेही वर्णन केले आहे की,

भाव धरी तया तारीला पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ।।

याचा अर्थ असा की जो श्रद्धा ठेवील त्याचा उद्धार दगडही करील. दगडाच्या मूर्तीवर भाव ठेवला तर त्या मूर्तीच्या योगाने भाविक तरू शकतो. म्हणजे तुकाराम महाराज दगडाच्या मूर्तीचा एका बाजुने निषेधही करतात, तर दुसऱ्या बाजुला ते म्हणतात की तुमची दगडावर श्रद्धा असेल तर तुम्हाला तो प्रसन्न होईल. येथे तुकारामांच्या विचारात काही प्रमाणात विसंगती आढळते. पंढरीचा विठ्ठल हेच आपले दैवत आहे. त्यामुळे संत तुकाराम महाराज म्हणतात –

करोत तपादि साधनें । कोणी साधोत गोरांजनें ।
आम्ही नवजों तया वाटा । नाचूं पंढरी चोहटां।।

कोणी मोक्षप्राप्ती करता जपतप आदी साधने करतात, त्यांनी खुशाल करोत, कोणी देह जाळून घेतात. आम्हाला त्या वाटेने जायचे नाही कारण आम्ही पंढरीच्या चव्हाट्यावरच नाचणार अशी भक्ती ते आपल्या अभंगातून व्यक्त करतात. कारण हा पंढरीनाथ भक्तांचे

दुःख दूर करतो. त्यांच्या मदतीला धावून येतो, म्हणून संत तुकारामांनी ग्रामदैवतांचा अव्हेर करुन विठ्ठल भक्तीलाच प्रमाण मानले आहे.

**तुकारामांच्या अभंगातील कृषीजीवन**

संत तुकारामांचे जीवन आणि कार्य हे ग्रामीण भागात व्यतित झाले असल्यामुळे, त्यांच्या अभंगातून शेती विषयी अनेक अभंग आले आहेत त्याचबरोबर अनेक अभंगातून शेतीशी संबंधित घटकांचा वारंवार उल्लेख आलेला आहे. संत तुकारामांनी शेतातील पाण्याला देहातील प्राणा एवढेच महत्त्व दिले आहे.

प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ।

तुका म्हणे जीवनेवीण । पीक नव्हे नव्हे जाण ।।

शेतीसाठी पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व येथे अधोरेखित केले आहे. आपल्या अभंगांच्याद्वारे ते शेतकऱ्यांना एक प्रकारे प्रबोधन करतात. उदा. पाऊस, जमीन, बीज, माती, पेरणी यांविषयी ते वारंवार दाखले देतात.

माणसाजवळ जमीन असली, बियाणे असले, पाणी मुबलक असले तरीही त्याला भरपूर पीक येईल असे नाही. कारण त्यासाठी अमाप कष्ट करावे लागतात तेव्हाच आपल्याला फलप्राप्ती होते. याची जाणीव करुन देताना तुकाराम महाराज म्हणतात.

बीजापोटी पाहे फळ । विध न करिता सकळ ।

तया मूर्ख म्हणावे वेडे । कैसे तुटेल साकडे ।।

संत तुकाराम हे वारकरी असले तरी ते पहिले शेतकरी आहेत. म्हणून त्यांच्या अभंगातून शेती विषयक प्रतीक, प्रतिमा, दृष्टांत आलेली आहेत. असे असले तरीही तुकारामांनी शेती आणि अध्यात्म यांचा योग्य मेळ घातलेला दिसतो. संत तुकारामांनी शेतीच्या माध्यमातून विठ्ठलाचे माहात्म्य कसे सांगितले आहे हे खालील अभंगातून अधिक स्पष्ट होते.

शेत करारी फुकाचे । नाम विठोबारायाचे ।

नाही वेठा जेवा सारा । जाहती नाही म्हणियारा ।।

थोडक्यात शेती हा संत तुकारामांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय होता म्हणून त्यांनी आपल्या कवितेतून असंख्य तपशील पुन्हा पुन्हा सांगितले आहेत.

**संदर्भ**


१. वासुदेव बळवंत पटवर्धन, गणेश हरी केळकर- 'श्री तुकारामाच्या अभंगांची चर्चा'- खंड-१, साहित्य अकादेमी, प्र.आ २००९.
२. प्रमोद महाराज जगता- 'सुजनवाक्य', शिवसह्याद्री प्रकाशन, दृवि. आ. २००३.
३. सदानंद मोरे- 'तुकाराम दर्शन', दृवि. आ. २००१.
४. भिंगारकर कृ. ज्ञा.- 'संत तुकारामः वाङ्मय आणि तत्त्वज्ञान', पुणे विद्यापीठ चर्चासत्र, २०१०.
५. तानाजी पाटील- 'संत तुकारामः वाङ्मय आणि तत्त्वज्ञान', पुणे विद्यापीठ चर्चासत्र, २०१०.
६. साळुंखे आ.ह.- 'संत तुकारामांचे अभंग शतक,' शिवधर्म प्रकाशन, प्र.आ २०१३.
७. नसिराबादकर ल.रा.- 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,' फडके प्रकाशन, स.आ.१९९७.





ISSN No. 2319-6025


# संत तुकारामांच्या अभंगातील लोककथा


**डॉ. यशवंत चव्हाण**

सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड.


भारत ही लोककथांची जननी आहे, असे मानले जाते. प्राचीन काळापासून लोककथांचा प्रभाव समाजमनावर आहे. लोककथांचा वापर करून मनोरंजन, उपदेश करण्याचा प्राचीन काळापासून अविरत सुरू आहे. आपल्या भारतीय वाङ्मयात म्हणूनच कथात्मक साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कथा एकाचवेळी मनोरंजन आणि प्रबोधनही करीत असते. हे लक्षात घ्यावे लागते. लोककथेच्या याच वैशिष्ट्यांचा वापर करून तुकारामांनी लोकमानसाला हात घालण्यासाठी लोककथेच्या अंगांनी जाणारी अभंगरचना केली ती वैशिष्ट्यपूर्ण आहे.

सुखे वोळंब दावी गोहा। माझें दुःख नेणा पाहा।।

आवडीचा मारिला वेडा। होय होय कैसा म्हणे भिडा ।।

या अभंगात तुकारामांनी उपरोधी भाषेत एका संसारिक कुटुंबाची कथा सांगितली आहे. या अभंगातील स्त्री सुखाला चटावलेली आहे. साऱ्यांनी विशेषतः नवऱ्याने सदैव आपलेच कौतुक करावे असे तिला वाटते. ही सुखासीन स्त्री सदोदित पतीच्या मागे भुणभुण लावते. मला भूक लागत नाही, अन्न पचत नाही, दिवसास कसे तरी पायलीभर गहू पुरतात. गेल्या बाजारी तुम्ही आणून दिलेली साडेदहा शेर साखर कशीतरी सात दिवस पुरली. पोटात दुखते म्हणून मला दूधभात व तूप साखर याच्या पथ्यावर रहावे लागते इत्यादी तक्रारी करते. या तक्रारींना नवरा 'हो हो खरंच आहे' असे म्हणत कबुली देतो. बायकोच्या अशा गोष्टींना सहमती देणारा बायल्या नवरा या जन्मी गाढवाबरोबरचाच असतो आणि मेल्यावर तो नरकात जातो, असे तुकोबा म्हणतात. मग ही लोककथा एक लोकोक्तीचेच रूप बनून लोकजीवनात रूढ होऊन बसते. तुकोबांनी अशा कथात्म रचनेतून सामान्य संसारीजनापुढे एक परिपाठ ठेवला आहे.

अशाच प्रकारचा एक अभंग संत एकनाथांचा आहे. 'बाई मी भोळी गं बाई मी भोळी। आठा दिसा खाते पुरणाची पोळी ।। हाही अभंग उपरोधिक भाषेतच आहे. तुकारामांनी अशाच आणखी एका अभंगातून एक कथा सांगितली आहे -

जातो वाराणसी। निरवी गाई घोडे म्हैसी।।

गेलों येतों नाहीं ऐसा । सत्य मानावा भरवसा ।।

या अभंगातील एक वयोवृद्ध काशीला चालला आहे. परंतु त्याचे मन संसारातील क्षुद्र गोष्टीत अडकून पडले आहे. तो म्हणतो, 'मी जातो आणि लगेच परत येतो तोपर्यंत तुम्ही धान्याची पेवे फोडू नका. भुसा आणि फोलकटे खाऊन रहा. दारात कोणी भिकारी आला तर त्याला हकलून द्या, कोणा ब्राह्मणाला जेवायला बोलवू नका. मी आजपर्यंत पैसा कसा जतन केला हे लक्षात घ्या. औषधालाही मी पैसा खर्च केला नाही तुम्ही ताक पाणी खाऊन रहा, तूप-लोण्याचे जतन करा. तुम्ही काही खर्च करू नका, माझ्या बायका पोरांची नागवण व्हावी


ISSN No. 2319-6025





Scanned with CamScanner